|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
North Maharashtra University, Jalgaon
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
A' Grade
'(NAAC Re-Accredited )
3rd Cycle
पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

**बातमी क्र.१**

जळगाव दि. १३ ( ) बीजगणित, विश्लेषण आणि संख्यासिद्धांत या विषयातील नवे प्रवाह तरुणपिढीने समजून घ्यावेत आणि त्यादृष्टीने संशोधन करावे असे आवाहन गणितशास्त्रज्ञांनी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात आयोजित राष्ट्रीय परिषदेत केले.

विद्यापीठाच्या गणितशास्त्र प्रशाळेच्या वतीने दि. १३ जानेवारी पासून `अलजेब्रा, ॲनलिसिस् ॲण्ड नंबर थेअरी` या विषयावर आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेला प्रारंभ झाला. या परिषदेत टाटा इन्स्टिटयूट, मुंबई येथील प्रा.सी.एस.राजन यांनी वैदीक गणितापासून आतापर्यंतच्या गणितातील सर्व प्रवाह सांगतांना बोधायन ते पायथागोरस सिद्धांताची मांडणी केली. एम.वन्नीनाथन्, के.सुरेशकुमार, एच.अनंतनारायण, सौरव पॉल, संतनू डे,इंद्रनाथ सेनगुप्ता, दिलीप पाटील, पी.विरमणी या गणिततज्ज्ञांनी बीजगणित आणि संख्यासिद्धांत या विषयी सखोल मांडणी केली.

दुपारच्या सत्रात ३० संशोधकांनी आपले शोधनिबंध सादर केले. या परिषदेत २२५ जण सहभागी झाले असून त्यामध्ये देशातील २५ प्रख्यात गणिततज्ज्ञांचा समावेश आहे. उदया रविवार, दि.१४ जानेवारी रोजी पद्मश्री आर.बालसुब्रमणियन (आयआयटी, मुंबई), जे.के.वर्मा, यु.के.आनंदवर्धन, दिगंता बोरा, महेश धुमलदार, अनिषा चोरवडाला, रवी रघुनाथन, ए.सुरेशकुमार हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. सायंकाळी परिषदेचा समारोप होईल. या परिषदेसाठी निमंत्रक डॉ.एस.आर.चौधरी यांच्यासह समन्वयक प्रा. एच.एल.तिडके, सदस्य प्रा.के.एफ.पवार, प्रा.सी.टी.आगे हे परिश्रम घेत आहेत. शनिवारी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्यासह सहभागी झालेल्या गणितज्ज्ञांनी ऑनलाईन परीक्षा केंद्राला भेट दिली.

---

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१३ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर नोंदणीकृत पदवीधरांमधून निवडून द्यावयाच्या दहा जागांसाठी २१ जानेवारी रोजी निवडणूक होत असून ३२ उमेदवार रिंगणात आहेत.

रविवार, दि.२१ जानेवारी रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत २६ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. ही निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी शुक्रवारी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. अराखीव संवर्गातून पाच उमेदवार अधिसभेवर निवडून द्यावयाच्या आहेत. त्यासाठी १८

उमेदवार रिंगणात आहेत. त्यामध्ये विलास बडगुजर, विष्णू भंगाळे, संजय भोकरडोळे, जमिल देशपांडे, अतुल कदमबांडे, अमोल मराठे, दिनेश नाईक, प्रवीण नेरपगार, दीपक पाटील, प्रकाश पाटील, सत्यजित पाटील, कुणाल पवार, अश्फाक पिंजारी, अमोल सोनवणे, प्रितेश ठाकूर, उमाकांत वाणी, निखिलकुमार वायकोळे व यशवंत येवलेकर यांचा समावेश आहे.

अनुसूचित जाती संवर्गातून एक उमेदवार निवडून द्यावयाचा असून अंकुश कटारे,दिनेश खरात, शिरीषकुमार तायडे हे तीन उमेदवार उभे आहेत. अनुसूचित जमाती संवर्गातून एका जागेसाठी दोन उमेदवार रिंगणात आहेत. त्यात नितीन ठाकूर व गणेश सोनवणे यांचा समावेश आहे. विमुक्त जातींमधून एका जागेसाठी रवींद्र हरपे, भूषण लाडवंजारी, विवेक लोहार हे तिघे तर इतर मागासवर्गातून एका जागेसाठी विलास बडगुजर, योगेश भावसार, अमोल पाटील हे तीन जण उभे आहेत. महिलांमधून एका जागेसाठी मनिषा चौधरी, मंजुला मुंदडे व वंदना पाटील हे तीन उमेदवार रिंगणात आहेत.

या निवडणूकीसाठी वापरण्यात येणाऱ्या मतपत्रिकेचे नमुने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. दरम्यान या निवडणूकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे प्रशिक्षण सोमवार, दि.१५जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात होणार असल्याची माहिती कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी भ.भा.पाटील यांनी दिली.

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : १३ जानेवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी